# रामशेठमुळे रयतेला कोणतीही चिंता नाही - नामदार डॉ.पतंगराव कदम

पनवेल (प्रतिनिधी) रामशेठ ठाकूर यांच्या सारखे दानशूर व कतृत्ववान माणसे आहेत, म्हणूनच रयतेला कोणतीही चिंता नाही, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे वने, पुनर्वसन व मदतकार्य आणि भूकंप पुनर्वसन मंत्री डॉ.पतंगराव कदम यांनी रिटघर येथे गुरूवारी केले. आमदार प्रशांत ठाकूर आणि त्यांच्या कुटुंबियांनी दिलेल्या ०१ कोटी २० लाख रूपये आर्थिक सहकार्यातून रयत शिक्षण संस्थेच्या रिटघर येथील श्री भैरवदेव माध्यमिक विद्यालय व लोकनेते रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या भव्य नुतन इमारतीचे उदघाटन तसेच नामकरण सोहळा नामदार डॉ.पतंगराव कदम यांच्या हस्ते आज (दि.०७) झाले. त्याप्रसंगी ते बोलत होते.

डॉ.कदम पुढे म्हणाले की, रायगड जिल्हयातील जनता भाग्यवान आहे, त्यांना रामशेठ सारखे दातृत्व मिळाले आहे. अनन्यसाधारण यश संपादन करून सुध्दा रामशेठ ठाकूर जुने दिवस विसरले नाहीत, ते नेहमी सर्वसामान्य माणसाच्या सोबत राहिले त्याचप्रमाणे प्रशांत व परेश ही त्यांची दोन्ही मुले व कुटुंबियांनीही सामाजिक जाणिव ठेवली आहे, अशा शब्दात नामदार कदम यांनी कर्तबगार ठाकूर कुटुंबियांचा गौरव केला. आमदार प्रशांत ठाकूर यांच्याबद्दल बोलताना ते म्हणाले की, आपल्या विधानसभा क्षेत्राची चिंता वाहणारा, प्रत्येक विषयात लीन होवून अभ्यासूवृत्तीने लक्ष घालणारा कष्टाळू आमदार मी आजवर पाहिला नाही. त्यामुळे प्रशांतला भविष्यात मोठी संधी असून त्याचे राजकीय भविष्य अधिक उज्ज्वल आहे, असेही नामदार डॉ.पतंगराव कदम म्हणाले.

आधुनिक युगात शिक्षण क्षेत्रात अधिक स्पर्धा निर्माण झाल्याने विद्यमान आणि पुढच्या पिढीच्या शिक्षणासाठी व्यवस्था करणे ही आपली जबाबदारी आहे. कर्मवीर अण्णांचा वारसा वारसा पुढे नेऊन त्यांचे पाईक होऊ असा निश्चय करून रिटघरसारख्या दुर्गम भागात शाळा असली तरी त्या विद्यालयाची नवीन ओळख निर्माण व्हावी यासाठी भव्य इमारत उभारण्याचा संकल्प हाती घेतला आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या आशिर्वादामुळे खऱ्या अर्थाने हे आपण काम करू शकलो आहोत, असे रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी यावेळी म्हंटले. या विद्यालयास माझे नाव देवू नये अशी विनंती मी केली होती, पण तरीही कार्यकर्ते आणि ग्रामस्थांनी माझे नाव दिले असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

रयत शिक्षण संस्थेचे व्हाईस चेअरमन डॉ.अनिल पाटील यांनी सामगितले की, नामदार पतंगराव कदम आणि लोकनेते रामशेठ ठाकूर एकत्र येतात तेव्हा कुठल्याही गोष्टीची चिंता राहात नाही. या दोन्ही थोर व्यक्ती कर्मवीर अण्णांच्या वाटेवर वळली, राजकारणाबरोबरच शैक्षणिक सुरू केल्या व त्या नावारूपाला आणल्या परंतू तरीही सहकार्याच्या भुमिकेतून रयत शिक्षण संस्थेला न विसरता या संस्थेची जबाबदारी आपल्या खांद्यावर घेतली आहे. कर्णही लाजेल अशा देणग्या या संस्थेला या नामदार पतंगराव कदम व लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी दिल्या आहेत. रामशेठ ठाकूर यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठीच त्यांचा विरोध असूनही या विद्यालयाला त्यांचे नाव देण्याचे ठरविले असल्याचे डॉ.पाटील यांनी स्पष्ट केले.

रिटघर विद्यालयाचे पालक तथा समन्वय समितीचे सदस्य आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, पनवेलभोवती अनेक उपनगरं तयार होत असून या भागात अनेक धनिक आहेत परंतु ग्रामीण भागात कोणीही लक्ष द्यायला तयार नाहीत.अनेक इमारती, निवासी संकुलं व वसाहती निर्माण होत आहेत, या सर्वांसाठी शिक्षणाची सोय मात्र 'रयत शिक्षण संस्था' करीत आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली तरूणांना व गरजूंना त्यांच्या पायावर स्वकतृत्वाने उभे करण्याचे काम रयत संस्था करीत असून या संस्थेतील एक सदस्य असल्याने मी स्वतःला भाग्यवान समजतो, असेही आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले.

समन्वय समितीचे सदस्य जी.आर.पाटील यांनी प्रास्ताविकपर भाषणात सांगितले की, अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत १९८४ सालापासून ही शाळा उभी होती. जीर्ण झालेल्या वर्गखोल्यांमुळे येथील विद्यार्थी, शिक्षक व पालकांना अत्यंत विकट अवस्थेला व अनेक समस्यांना सामोरे जावे लागत होते. या संदर्भात लोकनेते रामशेठ ठाकूर व आमदार प्रशांत ठाकूर यांनी लक्ष घातले. आमदार प्रशांत ठाकूर यांनी या विद्यालयाला दत्तक घेवून लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली ०१ कोटी २० लाख रूपये स्वखर्च करत शहरी इमारतीला लाजवेल अशी सुसज्ज व भव्य इमारत उभारून कधीही ऋण न फिटणारी सेवा या परिसरातील नागरिकांची केली आहे, असेही पाटील म्हणाले.

या समारंभात विद्यालयासाठी मदत करणाऱ्या ठाकूर कुटूंबियांचा तसेच इतर देणगीरांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये सुभाष पुंडलिक भोपी (०३ लाख रूपये), गुलाब भोपी (एक वर्ग खोली), ओएनजीसी (३ लाख ५० हजार रूपये), ग्रामस्थ मंडळ रिटघर (एक वर्ग खोली व दोन एकर जागा) नामदेवशेठ फडके, धर्मा भोपी, बाळ सुर्वे यांचा तसेच शाळेचे संस्थापक सदस्य पुंडलिक भोपी, धर्मा भोपी, रामभाऊ भगत, विठठल भोपी, पुंडलिक शेळके, जयवंत खोपकर, भाऊ पाटील, भाऊ सिनारे, दादू दिसले, कृष्णा पाटील, बाळाराम भोपी, मारूती पाटील, राजेश भोपी, शाम भोपी, तुकाराम पाटील, शालिक सिनारे, गोपिनाथ भोपी, नारायण भोपी, गणू भोपी त्याचबरोबर विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक एन.बी.ढोरे, जे.बी.मोरे, सौ.बी.एस.नाईक, बी.बी.पाटोळे, पी.टी.पाटील, एस.एस.टेंगळे, बी.आर.पाटील आणि एस.डी.साळुंखे यांचा नामदार पतंगराव कदम व मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या सोहळयास उपाध्यक्ष गोपीकिसन पाटील, उपाध्यक्षा जयश्री चौगुले, सचिव डॉ.गणेश ठाकूर, माजी सचिव डॉ.अरविंद बुरूंगले, ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे, रायगड विभागीय चेअरमन पी.जे.पाटील, ज्येष्ठ नेत्या शकुंतला ठाकूर, रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडी सदस्य अरूणशेठ भगत, उच्च शिक्षण समितीचे सदस्य महेंद्र घरत, कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते डॉ.भक्तीकुमार दवे, सहसचिव डॉ.डी.डी.पाटील, ऑडिटर एस.आर.डोंगरे, पनपचे शिक्षण मंडळाचे सभापती वाय.टी.देशमुख, शिक्षण सभापती एकनाथ गायकवाड, नगरसेवक गणेश पाटील, प्रकाश विनेदार, गणपत म्हात्रे, नगरसेविका कल्पना ठाकूर, विभागीय अधिकारी एस.एस.टेंगळे, युवा नेते परेश ठाकूर, इंटकचे तालुकाध्यक्ष संजय पाटील, वाशी कॉलचे प्राचार्य डॉ.व्हि.एस.शिवणकर, महात्मा फुले पनवेल महाविद्यालयाचे प्राचार्य संजय कांबळे, प्रा.आर.डी.गायकवाड, एच.आर.मढवी, श्री.कारंडे, तालुका कॉंग्रेसच्या अध्यक्षा ॲड.आशा भगत, कार्याध्यक्षा रत्नप्रभा घरत, अर्चना ठाकूर, पनवेल विधानसभा महिला प्रभारी दर्शना भोईर, तालुका उपाध्यक्षा सुगंधा कोळी, पेंधर ग्रामपंचायतीचे सरपंच धर्मनाथ भोईर, उत्तर भारतीय सेलचे जिल्हाध्यक्ष सुनिल विश्वकर्मा, झनक सिंग, ज्येष्ठ कार्यकर्ते कुमार नाईक, वासुदेव गवते, वैशाली भोपी, निर्मला भोपी, बाळाराम भोपी, सुभाष भोपी, बळीराम भोपी, धर्माबुवा भोपी, नारायण पाटील, शशिकांत भगत, राजेश भोपी, एस.पी.साळुंखे, शांताराम चौधरी, भाऊ सिनारे, गणू भोपी, शत्रुघ्न उसाटकर, सुनिल पाटील, शरद खारकर, यांच्यासह स्कूल कमिटीचे सदस्य, पदाधिकारी, विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.